
॥ शिवसूर्य ॥
फाटले आभाळ जैसा, पाऊस आसवांचा
गडगडले मेघ जणू, तो हुंकार वेदनांचा ॥ १ ॥
गजबजल्या देशी भाव, स्मशान शांततेचा
व्यवहार येथ चाले, साऱ्या मूक माणसांचा ॥ २ ॥
माणुसकी-प्रेम विरले, व्यापार भावनांचा
नियम कायदा सारा, द्विपदी श्वापदांचा ॥ ३ ॥
नाडला सामान्य, यातना आवाज दाबण्याचा
व्याघही भ्यायला इथे, पाहून झुंड भेकडांचा ॥ ४ ॥
भेदरली जनता अवघी, वेध तिमिर भेदण्याचा
उगवेल काय सूर्य?, परत निरभ्र स्वातंत्र्याचा ॥ ५ ॥
किर्र निबिड निशेत, श्वास घुसमट चांदण्यांचा
सरे रजनी उगवला, सूर्य नव्या तेजाचा ॥ ६ ॥
संकल्प मनी नवा, विचार थोर उद्याचा
आश्वस्त बीज रुजे, विचार स्वराज्याचा ॥ ७ ॥
सांभाळिले प्रजेला, जणू फोड तळहाताचा
शत्रू धुळीस मेळवून, फोडी तख्त मदांधांचा ॥ ८ ॥
तोषली सुखावली जनता, नयनी पाट सुखाश्रूंचा
त्यास म्हणती दुनिया सारी, देश शिवरायांचा ॥ ९ ॥
शब्द अपुरे कवींना, वर्णिता पराक्रम शिवबांचा
राजास सलाम माझा, चरणी मुजरा सहस्त्रांचा ॥ १० ॥
श्री. शिव चरणरज,
© सचिन पु. कुलकर्णी